# <u>विटा येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात</u>
# <u>ता. खानापूर, जिल्हा- सांगली.</u>

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११८/२०२४**

**कल्पना सुरेश ऐवळे व इतर ........... अर्जदार**

**विरुध्द**

**सुरेश राजाराम ऐवळे व इतर ........... जाबदार**

## <u>निशाणी ५ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, कलम २३ अन्वये जाबदार कडून दरमहा रक्कम रु.१५,०००/- अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**<u>अर्जदारा यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे -</u>**

**२.** अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचा विवाह हिदुधर्म शास्त्राप्रमाणे दिनांक १९.०५.१९९४ रोजी जाबदार क्र.१ यांचे घरासमोर मौजे बाणुरगड, ता.खानापूर, जि.सांगली येथे झाला. अर्जदार क्र.१ हीस जाबदार क्र.१ यांचे पासून अर्जदार क्र.२ कु.रसिका, अर्जदार क्र.३ भाग्यश्री अशी दोन मुली व रोहित नावाचा मुलगा अशी अपत्ये आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही जाबदार यांचे घरी बाणूरगड येथे नांदत असताना अर्जदार क्र.१ यांनी त्याची सर्व कर्तव्य पार पाडत होती. जाबदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांना दिनांक ३०.०५.१९९५ रोजी अर्जदार क्र.२ रसिका ही मुलगी झाली. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांच्या चारीत्र्यावर संशय घेवून अर्जदार क्र.१ यांचे नातेवाईकांसोबत वादावाद केला व दवाखान्याचा खर्च देण्यास नकार दिला. जाबदार क्र.२ ते ४ हे जाबदार क्र.१ यांचे कान भरत असून जाबदार हे अर्जदार क्र.१ यांना शरीरीक व मानसिक त्रास देत होते.

याउलट जाबदार क्र.१ यांचे इतर महिलांशी असलेले अनैतिक संबंध अर्जदार क्र.१ यांना समजून आलेनंतर अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे सासुसारे व आईवडील यांना सांगितले असता जाबदार याने स्वत:ची चुक मान्य करुन अशी चुक होणार नाही अशी कबुली दिली होती.

**३.** दिनांक ०६.०२.१९९७ रोजी अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांना रोहित नावाचा मुलगा झाला व दिनांक १०.०२.२००० साली भाग्यश्री नावाची मुलगी झाली. लग्नानंतर जाबदार क्र.१ ने काही दिवस अर्जदार क्र.१ यांना कसेबसे नांदविले व त्यानंतर दारु पिऊन येवून नाहक शारीरीक व मानसिक त्रास देत होते. जाबदार क्र.१ ने पती व पिता या नात्याने अर्जदार क्र.१ व मुलांची कधीही कपडेलत्ता, खाणपान, औषधोपचार, शिक्षण यांची तरतुद केली नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ यांचे वडील अर्जदार क्र.१ ते ३ व रोहित यांच्या खर्चाकरीता पैसे पाठवित होते. सन २०१७ साली अर्जदार क्र.१ ते ३ व रोहित तसेच जाबदार क्र.१ हे विटा येथे एकता कॉलणी घरकुल या ठिकाणी राहणेसाठी गेले. परंतू जाबदार क्र.१ ने त्यांचे अनैतिक वागणे सुरुच ठेवले. दिनांक १०.१२.२०२० रोजी दिवाळीमध्ये चि.रोहित कामासाठी घराबाहेर गेलेचा फायदा घेवून जाबदार क्र.१ ने दारु पिऊन अर्जदार क्र.१ यांना मारहाण करुन अर्जदार क्र.१ हीस ढकलून देवून अर्जदार क्र.१ यांचा गळा दाबून कुकरचे झाकण घेवून अर्जदार क्र.१ यांचे डोक्यात मारण्याचा प्रयत्न केला. सदर दिवशी अर्जदार क्र.१ ने जाबदार क्र.१ यांचे विरुध्द पोलीस ठाणेत तक्रार दाखल केली होती.

**४.** सन २०२१ मध्ये अर्जदार क्र.१ चे सासरे आजारी असलेने त्यांना भेटणेकरीता अर्जदार क्र.१ गेल्या व त्यांना जाबदार क्र.१ हा अर्जदार यांना देत असलेल्या त्रासाबाबत सांगितले. या गोष्टीचा मनात राग धरुन अर्जदार क्र.१ या विटा येथे आल्यानंतर जाबदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना मारहाण केली. अर्जदार क्र.१ यांनी पुन्हा जाबदार क्र.१ यांचे विरुध्द दिनांक २६.०३.२०२१ रोजी तक्रार दाखल केली. जानेवारी २०२२ मध्ये जाबदार क्र.१ चे वडील मयत झालेनंतर अर्जदार क्र.१ ते ३ व रोहित हे बाणुरगड येथे गेले असता जाबदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदार क्र.१ सोबत भांडण करुन अपमानास्पद

वागणूक दिली होती. जाबदार क्र.१ हा घर व भांडी विकणेची धमकी देत असतना अर्जदार क्र.१ या जाबदार यास समजावून सांगत असताना जाबदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हीस पुन्हा मारहाण केली. त्यामुळे दिनांक २१.०८.२०२३ रोजी अर्जदार क्र.१ यांनी पोलीस ठाणेत तक्रार दाखल केली. दिनांक ०३.०१.२०२३ पासून जाबदार हा त्याचे मुळ गावी बाणूरगड येथे राहत आहे. जाबदार क्र.१ ने स्वत:हून अर्जदार क्र.१ ते ३ व रोहित यांचा त्याग करुन वेगळे राहत आहे तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांची नाहक बदनामी करीत आहे.

५. जाबदार क्र.१ हा फोटोग्राफीचा व्यवसाय करीत असून लग्नाच्या ऑर्डर देखील घेत आहे. सदर फोटोग्राफीच्या व्यवसायातून जाबदार क्र.१ यास दरमहा र.रु.४०,०००/- इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदार क्र.१ हा जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असून त्यातून त्यांना दरमहा र.रु.३०,०००/- इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचे मौजे बाणुरगड येथे २ एकर शेतजमीन असून त्यातून त्यांना दरसाल र.रु.दोन लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांची जेवणखाण, औषधोपचार, शिक्षण याची कोणतीही जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळे मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांना दरमहा र.रु.१५,०००/- दरम्यानची पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**<u>जाबदार यांनी निशाणी ८ येथे म्हणणे दाखल केले आहे ते खालीलप्रमाणे</u>**

६. जाबदार यांनी अर्जदार यांच्या अर्जातील कथनांचा इन्कार केला आहे. अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचे दिनांक १९.०५.१९९४ रोजी लग्न झालेले आहे. लग्नाचा खर्च अर्जदार यांचे वडीलांनी केला आहे. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही जाबदार यांचे सोबत सहा महिने व्यवस्थित नांदली. त्यानंतर काही माहिन्यात अर्जदार क्र.१ हीने जाबदार क्र.१ यास 'मला बाणूरगड येथे रहावयाचे नाही, विटा येथे राहात असाल तरच मी तुमचेकडे नांदणेस येणेस तयार आहे, नाहीतर मला तुमचेबरोबर नांदायचे नाही, मी माझे माहेरी मुंबई येथे निघून जाणार आहे' असे सांगितले. जाबदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदार क्र.१ ची समजूत

काढण्याचा प्रयत्न केला परंतू अर्जदार क्र.१ ही गावी राहणेस तयार नसल्याने नाईलाजास्तव जाबदार क्र.१ ने अर्जदार यांना घेवून विटा येथे राहणेस आले. अर्जदार क्र.१ हीने जाबदार क्र.१ यांचे वयस्कर आईवडीलांना व्यवस्थित सांभाळलेले नाही. जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हीचे सांगणेवरुन सन १९९५ पासून विटा येथील एकता कॉलनी येथे ९९ वर्षाचे कराराने घर घेतले आहे. तरी देखील अर्जदार क्र.१ ही जाबदार क्र.१ सोबत भांडण काढत असून वेळोवेळी घालून पाडून बोलत असे. सन २०२० साली जाबदार क्र.१ यांना कोरोना झाला होता त्यावेळी देखील अर्जदार क्र.१ हीने जाबदार क्र.१ याची कोणतीही काळजी घेतली नाही. अर्जदार क्र.१ हीने जाबदार क्र.१ यास जाणीवपुर्वक शारीरीक सुखापासून वंचीत ठेवले आहे. जाबदार क्र.१ याची मुलांना सांभाळणेची तयार असल्याचे व अर्जदार क्र.१ ही जाबदार यांचे सोबत संसार करणेची तयारी नसलेस संमतीने घटस्फोट देणेबाबत नोटीसीने कळाविले होते.

**७.** जाबदार क्र.१ हा मिळेल ती मोलमजूरीचे काम करुन संसार चालवित आला आहे. तसेच जाबदार क्र.१ यास सद्यस्थितीत राहणेसाठी घर देखील नाही. याउलट अर्जदार क्र.१ ते ३ यांचे ताब्यात विट्यातील घर आहे. जाबदार क्र.१ यांची आई वयस्कर असून त्यांना अर्धांगवायुचा व उच्चरक्तदाबाचा त्रास आहे. त्यांच्या उपचाराकरीता दरमहा ३ ते ४ हजार रुपये खर्च येतो. जाबदार क्र.१ याने आईच्या उपचाराकरीता लोकांचेकडून र.रु.२,००,०००/- इतके हातउसने घेतले आहेत. तसेच जाबदार क्र.१ वर स्टेट बँक शाखा खानापूर येथील र.रु.५,००,०००/- इतके कर्ज आहे. जाबदार क्र.१ कडे असलेली १२ गुंठे जमीन असून ती नापीक आहे. त्यातून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे अर्जदार यांनी केलेल्या मागणीनुसार जाबदार क्र.१ यास पोटगी देणेची ऐपत नाही.

**८.** याउलट अर्जदार क्र.१ ही टेलरिंगचा व्यवसाय करीत असून महिलांचे कपडे शिवत असून त्यातून तिला दरमहा र.रु.३०,०००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.२ व ३ या उच्च शिक्षीत असून विटा येथील कळंबीकर यांचे टंच मशिनचे दुकानामध्ये कामाला असून तिला दरमहा र.रु.४०,०००/- इतके उत्पन्न मिळते. रोहित हा पुणे येथे

शेअरमार्केटमध्ये नोकरीस असून त्यास दरमहा र.रु.१,००,०००/- इतका पगार आहे. त्यामुळे अर्जदार हीने केवळ जाबदार यांना त्रास देण्याच्या हेतून व पैसे उकळण्याच्या हेतून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांना पोटगी मागण्याची कोणतीही आवश्यकता नाही याउलट अर्जदार यांचेवर जाबदार यांना सांभाळण्याची जबाबदारी येत आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी जाबदार यांनी विनंती केली आहे.

**९.** अर्जदार व जाबदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षांच्या कथनांवरुन खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे -

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ते ३ हे ही जाबदार क्र.१ कडून अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहेत काय ? | **होय.**<br>**दरमहा र.रु. ३,०००/-** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

**- का र ण मि मां सा**

**१०.** कौटुंबिक हिंसाचार महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करु शकेल या हेतुने केली आहे.

**११.** प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार क्र.१ व जाबदार क्र. १ यांचा विवाह झाला असल्याबाबत व अर्जदार क्र.२ व ३ या अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांची अपत्ये असल्याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही.

**मुद्दा क्र. १ बाबत -**

**१२.** अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्व प्रथम अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या

म्हणण्यानुसार, जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ हीस शिवीगाळ करुन मारहाण करायचे तसेच तिच्या चारित्रयावर संशय घ्यायचे याउलट जाबदार क्र.१ च्या म्हण्यानुसार अर्जदार क्र.१ ही स्वत:हून जाबदार यांना अपमानास्पद वागणूक देत आहे तसेच जाबदार क्र.१ यांचे सोबत संसार करणेस तयार नाही अशी कथने केली आहेत.

**१३.** अर्जदार व जाबदार यांच्या कथनांचे अवलोकन करता, त्यांनी एकमेकांवर अनेक आरोप प्रत्यारोप केल्याचे दिसुन येते. परंतु, अर्जदार व जाबदार यांनी एकमेकांवर केलेले आरोप व प्रत्यारोप यावर त्या दोघांनाही पुराव्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही भाष्य करणे योग्य ठरणार नाही. अर्जदाराने मुळ अर्जात तिच्यावर केलेल्या हिंसाचाराबाबतच्या घटना तारखेनिशी नमुद केल्या आहेत. यावरुन अर्जदारास शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रासास सामोरे जावे लागले हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अर्जदार क्र.१ ने जाबदार याच्यावर केलेले आरोप पाहता ते आरोप निश्चितच गंभीर स्वरुपाचे आहेत. कोणतीही स्त्री गंभीर कारण नसताना तिच्या पतीपासून मुलांना घेवून राहते ही बाब संभाव्य वाटत नाही. प्रथमदर्शनी अर्जदार तिला होणा-या त्रासामुळे वेगळी राहत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार होत होता हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१४.** याउलट जाबदार यांनी अर्जदार क्र.१ वर केलेल्या आरोपांकरीता कोणताही तोंडी पुरावा दिलेला नाही. अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे अर्थिक कमाईचे साधन नसेल तर सामनेवला याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते.

**१५.** अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या अर्जात ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. जाबदार याने देखील अर्जदार कमावती असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदार सध्या कमावती नाही हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

**१६.** अर्जदार कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्याची जाबदार क्र. १ याची जबाबदारी असल्याने जाबदार क्र. १ कमावता आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, जाबदार याला फोटोग्राफीच्या व्यवसायातून व एजंट व्यवसायातून दरमहा रक्कम ₹ ३०,०००/- व शेती व्यवसायातून दरसाल र.रु.२,००,०००/- इतके उत्पन्न मिळते. परंतु अर्जदाराने जाबदार क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे जाबदार याचे निश्चित किती उत्पन्न आहे हे स्पष्ट होत नाही. जाबदार याने त्याच्या म्हणण्यामध्ये हे मान्य केले की, तो मजूरीचे काम करतो. यावरुन जाबदार याचेकडे उत्पन्नाचे काहीतरी साधन आहे ही बाब सिद्ध होते. तसेच जाबदार शारिरीकदृष्टया सक्षम आहेत त्यांना कोणत्याही प्रकारचे आजार व अपंगत्व असल्याचे जाबदारचे कथन नाही. अर्जदार ही जाबदार यांची पत्नी व मुले असल्याने त्यांचा अन्नवस्त्र, वैद्यकीय खर्च, शैक्षणिक खर्च देणे व सांभाळणे ही जाबदार याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे.

**१७.** अर्जदार यांनी कर्नाटक उच्च न्यायालय, धारवाड बेंच मधील अमित शंकरराव चौगुले वि. मेघा अमित चौगुले, रिट. पिटीशन क्र.१०२१२३/२०२४ मधील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की. *पतीने त्याच्याजवळ कोणताही धंदा नाही किंवा उत्पन्नाचे साधन नाही या अधारावर पोटगी रक्कम देण्यास टाळाटाळ करु शकत नाही. पत्नीस व मुलांना सांभाळण्याची त्याची नैतिक जबाबदारी आहे.*

जाबदार याचेकडे उत्पन्नाचे साधन असलेने अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही जाबदार क्र.१ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार जाबदार याचेकडून पोटगीची किती रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे बघणे आवश्यक ठरते. अर्जदार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***रजनेश विरुध्द नेहा २०२१ एस.सी.सी ३२४*** मधील निर्देशाप्रमाणे दाखल केलेल्या दायित्वाबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये जाबदार यास दरमहा र.रु. ३०,०००/– उत्पन्न मिळते तसेच शेतीतून

दरसाल र.रु.२,००,०००/– उत्पन्न मिळत असलेचे कथन केले आहे.

**१८.** अर्जदार यांचेपासून वेगळे राहिल्यापासून जाबदार क्र.१ याने अर्जदारास कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, परंतु अर्जदाराचे १० वी पर्यंत शिक्षण झाले आहे तसेच अर्जदार क्र.२ वय – २८ वर्षे व अर्जदार क्र.३ वय -२४ वर्षे या शिक्षीत असून त्या सज्ञान कमावत्या असल्यसानेअसल्याचे देखील प्रथमदर्शनी सिध्द होते. त्याचबरोबर चि.रोहित वय-२६ वर्षे हा देखील कमावता असल्याबाबत प्रथमदर्शनी सिध्द होते आहे. परंतू पत्नी व मुलांना सांभाळण्याची नैतिक जबाबदारी ही जाबदार याची आहे. त्यामूळे उपरोक्त सर्वबाबी विचारात घेता अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरिता जाबदार क्र. १ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना दरमहा र.रु.३०००/- देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते.

**- आ दे श -**

१. अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

२. जाबदार क्र. १ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकत्रीत दरमहा रक्कम रु.३,०००/- ( रु.तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावेत.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा.

४. अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसुन आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

६. आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार क्र. १ यांना मोफत देण्यात यावी.

PALLAVI MANSING SURYAWANSHI
Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2026.01.07 15:49:04 +0530

स्थळ - विटा
दि. ०७/०१/२०२६

**(श्रीमती पल्लवी मा. सुर्यवंशी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली